# जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालयातील पदभरतीसाठी जाहिरात.

क्र.कक्ष-२१/आस्था/अका/कावि-१०२१/२०१६, दिनांक ०८ ऑगष्ट, २०१६.

शासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई पत्र, क्र.भरती-२०१६/प्र.क्र.३०९/ई-७, दि.२३.०६.२०१६ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी, अमरावती यांचे आस्थापनेवरील **गट "क"** मधील **"तलाठी" व "वाहनचालक"** संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरीता पात्र उमेदवारांकडून **दि. २५ ऑगष्ट, २०१६** रोजी **सायं. ०५.००** वाजेपर्यंत *(ONLINE)* ऑन लाईन पध्दतीने अर्ज (चलान बँकेत भरुन विहीत मुदतीत अपडेट केल्यासह) मागविण्यात येत आहेत. **चलान बॅंकेत भरण्याची व अपडेट करण्याची अंतिम दिनांक हा ऑनलाईन अर्ज करण्याचा अंतिम दिनांक २५ ऑगष्ट, २०१६ हा राहील.** *ONLINE* व्यतिरिक्त अन्य मार्गाद्वारे अर्ज स्विकारले जाणार नाही. विहीत अंतिम मुदतीनंतर *ONLINE* /बँकेत चलान रोखीने भरल्यास ती स्विकारली जाणार नाही.

जाहिरात **www.collamt.com** व **www.amravati.nic.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहे.

## १) तलाठी व वाहनचालक पद भरती बाबत कार्यक्रमः-

| अ.क्र | कार्यक्रम | दिनांक |
|---|---|---|
| १ | अर्ज स्विकारण्याचा कालावधी (ऑनलाईन) | दि. १० ऑगष्ट, २०१६ ते<br>दि. २५ ऑगष्ट, २०१६ पर्यंत |
| २ | उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे | दि.२९ ऑगष्ट, २०१६ |
| ३ | प्रसिध्द केलेल्या यादीमधील चुकीबाबत उमेदवारांनी कार्यालयामध्ये समक्ष लेखी अर्ज करण्याची अंतिम तारीख | दि.३१ ऑगष्ट, २०१६ |
| ४ | झालेल्या चुकांची दुरुस्ती करुन उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. | दि.३ सप्टेंबर, २०१६ |
| ५ | उमेदवारांना ओळखपत्र निर्गमित करणे | दि.६ सप्टेंबर, २०१६ |
| ६ | तलाठी /वाहनचालक पदाची प्रत्यक्ष लेखी परीक्षा घेणे | दि.११ सप्टेंबर, २०१६ |

लेखी परीक्षेचा निकाल, अंतिम निवड यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या **amravati.nic.in** या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

उमेदवारांची यादी, परीक्षेचा निकाल, प्रारुप निवड यादी प्रसिध्द करणे, प्रसिध्द केलेल्या प्रारुप निवड यादीवर आक्षेप नोंदविणे व आलेल्या आक्षेपावर नियमानुसार कार्यवाही करुन अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे इत्यादीबाबत माहिती वेळोवेळी **www.collamt.com** व **amravati.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी वेळोवेळी संकेतस्थळावरील सूचना पहावी. या संदर्भात स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

## १) पदाचे नाव : तलाठी (वेतन बँड ₹५२००-२०२००) (ग्रेड वेतन ₹ २४००)

| प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | समांतर आरक्षणा व्यतिरिक्त |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | अंशकालीन | महिला | खेळाडू | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अपंग | |
| अनुसूचीत जमाती (पेसा वगळून) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | १ अस्थिव्यंग | १ |
| अनु.जमाती (पेसा) अनुसूचित क्षेत्रातील अमरावती जिल्हयातील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवाराकरीता | ७ | ० | ० | २ | ० | ० | ० | | ५ |
| विमुक्त जाती (अ) | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ |
| भटक्या जमाती-ब | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ |
| सर्वसाधारण | १६ | २ | २ | ५ | १ | ० | १ | | ५ |
| **एकूण** | २६ | २ | २ | ७ | १ | ० | १ | | १३ |

**टिप - वर नमुद केलेल्या सामाजिक आरक्षणामधील जागांमधून १ अस्थिव्यंग उमेदवार, ते ज्या प्रवर्गाचे असतील त्या प्रर्वगातील सामाजिक आरक्षणामधील १ पद कमी करुन अस्थिव्यंग उमेदवाराची निवड करण्यात येईल. जाहिरातीमधील सामाजिक प्रवर्गा व्यतिरिक्त प्रवर्गातील अपंग उमेदवार नियुक्तीस पात्र झाल्यास त्याची निवड खुल्या प्रवर्गाचे १ पद कमी करुन खुल्या प्रवर्गामधून भरण्यात येईल.**

## २) पदाचे नाव : वाहनचालक (वेतन बँड ₹५२००-२०२००) (ग्रेड वेतन ₹ १९००)

| प्रवर्ग | एकूण पदे | समांतर आरक्षण | | | | | | | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | माजी सैनिक | अंशकालीन | महिला | खेळाडू | भूकंपग्रस्त | प्रकल्पग्रस्त | अपंग | |
| अनुसूचित जाती | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ |
| इतर मागास वर्ग | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | | १ |
| **एकूण** | २ | ० | ० | ० | ० | ० | ० | | २ |

**टिप :-** वर नमूद केलेल्या पदसंख्येत व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. त्याबाबतचा संपूर्ण अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अमरावती यांचे राहतील.

## २) शैक्षणिक पात्रता :

| अ.क्र. | पदाचे नाव | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|
| १ | तलाठी | १) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी तसेच शासनाने त्यांच्याशी समतुल्य म्हणून जाहीर केलेली अन्य अर्हता.<br>२) **संगणक अर्हता-** शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. प्रशिक्षण २०००/ प्र.क्र.६१/२००१/३९, दि. १९.०३.२००३ नुसार संगणक अर्हता नियुक्तीच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उत्तीर्ण करणे आवश्यक राहील.<br>संगणक अर्हता प्राप्त प्रमाणपत्र अ) D.O.E.A.C.C सोसायटीच्या अधिकृत C.C.C किंवा O स्तर किंवा A किंवा B किंवा C स्तर यापैकी कोणतीही एक परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र किंवा ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचेकडील अधिकृत MS-CIT परीक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. |
| २ | वाहनचालक | १) इयत्ता चौथा वर्ग उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.<br>२) मोटार वाहन कायदा, १९३९ नुसार जड/हलके वाहन चालविण्याबाबत अनुज्ञप्ती धारण करणे आवश्यक आहे.<br>३) वाहन (कार/जीप) चालविण्याचा किमान ३ वर्षाचा अनुभव आवश्यक.<br>४) मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक.<br>५) निष्कलंक पूर्वाभिलेख, मोटार वाहन दुरुस्तीचे ज्ञान, सदृढ शरीरयष्टी व स्थानिक भौगोलिक क्षेत्राचे ज्ञान असणे आवश्यक आहे. |

**३) वयोमर्यादा :**

१. सदर पदासाठी उमेदवारांचे वय अर्ज करण्याच्या अंतीम दिनांकास किमान १८ वर्ष आवश्यक असून कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी वयोमर्यादा ३८ वर्ष व मागासवर्गीयांसाठी ४३ वर्ष राहील.

२. अपंग उमेदवारासाठी वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

३. प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

४. माजी सैनिकांसाठी कमाल वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

५. पदवीधर अंशकालीन उमेदवारांकरीता वयोमर्यादा ४६ वर्ष राहील.

६. खेळाडू उमेदवारांसाठी वयोमर्यादेत ०५ वर्षापर्यत वयाची अट शिथील राहील.

७. स्वातंत्र्य सैनिकाचे नामनिर्देशित पाल्य उमेदवारांची वयोमर्यादा ४५ वर्ष राहील.

८. जणगणना (सन १९९१ ची) उमेदवारांसाठी कार्यालयातील सलग सेवेचा कालावधी अधिक ५ वर्ष शिथिल केली जाईल. त्याबाबत अर्जदार/उमेदवार यांनी शासन निर्णय क्रमांक-१०९७/प्र.क्र ७७ ९७/१६-अ दि.१२/०३/१९९८ मधील निकष पुर्ण केलेले असावेत. शासन निर्णयानूसार दिनांक १८/०६/२०१५ रोजी उमेदवाराचे वय उपरोक्त मर्यादेमध्ये असणे आवश्यक आहे.

**४. अ ) माजी सैनिक उमेदवारांकरिता**

१. माजी सैनिक म्हणून शासन सेवेकरिता पात्र उमेदवार.

२. माजी सैनिक या समांतर आरक्षणाचा पूर्वी लाभ घेऊन शासकीय सेवेत नोकरी स्विकारली असेल तर समांतर आरक्षणाचे लाभास पात्र राहणार नाही. मात्र तो केवळ वयाची सवलत घेण्यास पात्र राहील.

**ब ) अंशकालीन पदवीधर उमेदवारांकरिता**

अंशकालीन पदविधर उमेदवारांनी जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रात अद्यावत नोंदणी केलेली असावी. सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

**क ) महिला उमेदवारांकरिता**

खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती / कुटूंबातील (क्रिमीलेअर) महिला सदस्यांना महिलासाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागावर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (ब), (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातीलमहिला सदस्यांना **महिलांचे आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही**.

**ड ) खेळाडू उमेदवारांकरिता.**

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक:राक्रीधी-२००२/प्र.क्र.६८/क्रीयसे-२, दिनांक ३०.४.२००५ नुसार विहीत केलेली अर्हता धारण करीत असलेल्या गुणवत्ताधारक खेळाडू उमेदवारांनी त्याबाबतचे क्रीडा/खेळ विषयक प्रमाणपत्र नियुक्तीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील.

२. प्रचलीत व मुख्य मान्यताप्राप्त खेळातील खेळाडूंना प्राधान्य देण्यात येईल.

**इ ) भूकंपग्रस्त उमेदवारांकरिता**

भूकंपग्रस्त असल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र आवश्यक राहील.

फ) **अपंग उमदवारांकरिता**

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि. २ मे, १९९८ अन्वये, अपंगांकरिता ३ % पदे आरक्षित असून त्यापैकी प्रत्येकी १% या प्रमाणे आरक्षण निश्चित केलेले आहे.

ग) **अनुसूचीत क्षेत्रातील स्थानिक उमेदवाराकरीता**

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार, दि.०९ जून, २०१४ अधिसूचनेनुसार अमरावती जिल्हयामधील अनुसूचित क्षेत्रामधील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवारांमधून तलाठी या पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या स्थानिक अनुसूचित उमेदवारामधून भरण्यात याव्यात. स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई - वडील किंवा आजी आजोबा अमरावती जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत आहेत अशा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पात्र ठरविण्यात येईल.

५. **अर्ज सादर करण्याबाबत आवश्यक सूचना.**

१) उमेदवारांना जाहिरातीमध्ये नमूद पदाकरिता विहीत केलेला *(ONLINE)* ऑन लाईन अर्ज **www.collamt.com** या संकेतस्थळावर उपलब्ध होईल. सदर अर्जाचे आवश्यक सर्व रकान्यात अचूक माहिती भरुन स्वत:चा अलीकडच्या काळातील फोटो व त्याखाली स्वत:ची स्वाक्षरी अपलोड करुन *(ONLINE)* ऑन लाईन अर्ज सादर करावयाचा आहे. जाहिरातीतील ऑनलाईन अर्ज स्विकारण्याचा कालावधी भरलेल्या चलान अद्ययावत ***(Update )***करुन ऑनलाईन पध्दतीने केलेले अर्ज स्विकारल्या जातील. मुदतीनंतर ऑनलाईन भरलेले अर्ज व चलान स्विकारली जाणार नाही. *ONLINE* व्यतिरिक्त अन्य मार्गाने अर्ज स्विकारले जाणार नाहीत. ऑनलाईन अर्ज भरतांना अपूर्ण माहिती असलेले, अर्जावर छायाचित्र *(Photo Copy)* व स्वाक्षरी नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. संकेतस्थळावरुन भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट काढून घ्यावी. संकेतस्थळावर भरलेल्या अर्जाची प्रिंट आऊट प्राप्त करुन घेतल्यावर सदर प्रिंट आऊटची एक छायाप्रत व चलानची प्रत काढून उमेदवारांनी स्वत:जवळ ठेवावी. स्वाक्षरी केलेल्या अर्जाची प्रत कागदपत्र पडताळणीच्यावेळी सादर करावी लागेल.

२) उमेदवारांनी जाहिरातीमध्ये दिलेल्या पदाच्या सामाजिक व समांतर आरक्षण असलेल्या प्रवर्गाच्या आरक्षणानुसारच अर्ज करावा. जाहिरातीमध्ये दिलेल्या पदाच्या सामाजिक व समांतर आरक्षण नसलेल्या प्रवर्गाच्या आरक्षणावर अर्ज करु नये. असे अर्ज उमेदवारांनी केल्यास स्विकारले जाणार नाहीत. तसेच **महिलांनी समांतर आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास अर्जामध्ये नमूद करावा.** ज्या महिला उमेदवारांनी अर्जामध्ये महिला समांतर आरक्षणाचा लाभ घेतलेला नाही त्या महिला उमेदवारांना महिला समांतर आरक्षणामधून निवड दिली जाणार नाही.

३) **अमरावती जिल्हयामधील अनुसूचित क्षेत्रामधील स्थानिक अनुसूचित जमातीच्या उमेदवार** (आवश्यक शैक्षणिक अर्हता असलेल्या उमेदवारांनी) यांनी **तलाठी** या पदाकरीता अर्ज करावा. स्थानिक अनुसूचित जमाती उमेदवारांव्यतिरिक्त अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज अपात्र ठरविण्यात येतील. तसेच अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई - वडील किंवा आजी आजोबा अमरावती जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा सबळ पुरावा आहे अशा अनुसूचित जमातीच्या स्थानिक उमेदवारांना सबळ पुराव्याशिवाय पात्र ठरविण्यात येणार नाही.

४) उमेदवाराने अर्ज सादर करतेवेळी **www.collamt.com** या संकेत स्थळावर नमूद केलेल्या अधिकृत *Application Center* वरुन करावयाचे आहे.

५) जाहिरातीमधील पदांकरिता लेखी परीक्षा जाहिरातीमधील परिक्षेच्या दिनांकास घेण्यात येणार असल्यामुळे उमेदवारांनी कोणत्या पदाकरिता अर्ज सादर करावयाचा याबाबत विचार करुन अर्ज सादर करावेत. *(ONLINE)* ऑन लाईन अर्ज सादर केल्यानंतर ऑनलाईन अर्जामध्ये कोणताही बदल करता येणार नाही.

६) मागासवर्गीय उमेदवारांनी त्यांना अर्ज ते ज्या सामाजिक आरक्षणात मोडतात त्या सामाजिक आरक्षणातून अर्ज भरावयाचा आहे की खुल्या प्रवर्गातून अर्ज भरावयाचा आहे याबाबत योग्य विचारपूर्वक आवश्यक माहिती संबंधित रकान्यामध्ये भरावी.

७) उमेदवाराने अर्ज करतेवेळी धारण केलेल्या शैक्षणीक अर्हतेबाबतची सर्व कागदपत्रे सोबत ठेवावी. त्याच बरोबर पासपोर्ट साईज अद्ययावत छायाचित्र Scan करण्याकरिता सोबत ठेवावे.

८) परीक्षा प्रवेशपत्र **www.collamt.com** या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

९) प्रवेश पत्र प्राप्त करण्यास व अर्ज भरण्यास काही अडचण निर्माण झाल्यास आपण ज्या केंद्रावर अर्ज भरतो त्या केंद्राशी *(Application Center)*संपर्क करुन उपलब्ध करुन घ्यावे.

१०) अंतीम निवड यादी इत्यादी विषयाची माहिती **www.collamt.com** या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

११) अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्राच्या छाननी शिवाय परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यामुळे उमेदवार परिक्षा पास/उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवर्ग निहाय, गुणानुक्रमे उमेदवाराच्या मूळ कागदपत्राची तपासणी केल्यानंतरच गुणवत्तेनुसार तातपुरती निवड यादी प्रसिध्द करण्यात येईल. केवळ परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास नोकरीचा कोणताही हक्क प्राप्त होणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबधित पदाच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा.

१२) उमेदवार त्या त्या पदासाठी सेवाप्रवेश नियमानुसार आवश्यक शारीरिक क्षमता धारण करणारा असावा.

१३)फक्त याच जाहिरातीला अनुसरुन ज्या उमेदवारांचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने विहित कालावधीत प्राप्त होतील केवळ अशाच उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. अन्य कोणत्याही मार्गाने व या संदर्भातील यापुर्वी प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत यांची कृपया नोंद घ्यावी.

## ६. परीक्षा शुल्क :

१) सदर पदाकरिता खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी अर्जासोबत ₹ **३००/-** (अक्षरी तीनशे रुपये फक्त) व मागासवर्गीय उमेदवारांनी ₹ **१५०/-** (अक्षरी रुपये एकशे पन्नास फक्त) इतके परीक्षा शुल्क भरणा चलानद्वारे **बँक ऑफ महाराष्ट्रा**च्या कोणत्याही शाखेतून जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निवड समिती, अमरावती यांच्या नावाने असलेल्या खाते क्रमांक - **६०१०००८०९१३५** मध्ये भरणे आवश्यक राहील. उमेदवारांना चलानवर पूर्ण नाव लिहणे आवश्यक आहे. तसेच लागू असलेले परीक्षा शुल्क अधिक बँकेचे सेवा शुल्क प्रत्येक चलानचे ₹ **६०/- (अक्षरी साठ रुपये)** फक्त आवेदकाने बँकेत भरावे. या भरती प्रक्रीयेसाठी **बँक ऑफ महाराष्ट्र** ही अधिकृत बँक राहील. माजी सैनिकांना आवेदनपत्र सादर करतांना शुल्क आकारले जाणार नाही. बँक चलानची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील. उमेदवारांनी परीक्षा शुल्क चलानद्वारेच भरावे. उमेदवारांनी परीक्षा शुल्क बँकेमध्ये ऑनलाईन चलान तयार न करता रोख (कॅश)स्वरुपात भरल्यास अर्ज रद्द केला जाईल. याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. **उमेदवारांनी अर्ज करावयाच्या दिनांकानंतर बँकेमध्ये चलानचा भरणा करु नये.** विहीत मुदतीनंतर चलानचा भरणा केल्यास उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. उमेदवारांनी चलानचा भरणा केल्यानंतर लगेच चलान अद्ययावत ***(Update)*** करणे आवश्यक राहील. अर्जाच्या अंतिम दिनांकापर्यंत चलान अद्ययावत ***(Update)*** न झाल्यास उमेदवाराचे नाव पात्र उमेदवारांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येणार नाही व अशा उमेदवारास परीक्षेलासुध्दा बसता येणार नाही.

२) प्रत्येक पदाकरिता स्वतंत्र परीक्षा शुल्क भरावयाचे आहे.

३) **बँक चलानचा नमूना : <u>www.collamt.com</u>** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. आवश्यक माहिती भरावी व त्याची प्रिंट काढून चलानचा भरणा करावा व चलान ***(Update)*** करावी.

**<u>टिप</u>** : परीक्षा शुल्क वर नमूद केल्याप्रमाणे फक्त बँक ऑफ महाराष्ट्राच्या कोणत्याही शाखेमध्ये चलानद्वारेच जमा करावे. रोख स्वरुपात व इतर स्वरुपात प्राप्त होणारे परीक्षा शुल्क स्विकारले जाणार नाही व अर्ज रद्द होईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

७. **लेखी परीक्षा प्रवेशपत्र :**

परीक्षा प्रवेशपत्र उमेदवारास **<u>www.collamt.com</u>** या संकेत स्थळावर जाहीरातीतील कार्यक्रमानुसार उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रवेशपत्र प्राप्त करण्यास काही अडचण निर्माण झाल्यास उक्त संकेतस्थळावरील दिलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा किंवा जिल्हाधिकारी, अमरावती. यांचे कार्यालयात संपर्क साधावा. लेखी परीक्षेकरीता प्रवेशपत्राशिवाय व प्रवेशपत्रावर छायाचित्र *(Photo Copy)* व स्वाक्षरी असल्याशिवाय कोणत्याही परिस्थीतीत परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. याची कृपया उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. **<u>लेखी परीक्षेचे स्वरुप</u>** :

१) तलाठी या पदाच्या लेखी परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील प्रश्नांकरिता प्रत्येकी **५० गुण** याप्रमाणे एकूण **२०० गुणांची** लेखी परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. उमेदवार गुणवत्ता पात्र ठरण्यासाठी **किमान ४५% गुण** प्राप्त करणे आवश्यक राहील

२) वाहनचालक या पदाच्या लेखी परीक्षेला मराठी, सामान्य ज्ञान व बौध्दिक चाचणी या विषयावरील **१२० गुणांची** लेखी परीक्षा घेण्यात येईल. या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाच्या असतील. उमेदवार गुणवत्ता पात्र ठरण्यासाठी **किमान ४५% गुण** प्राप्त करणे आवश्यक राहील. **८० गुणांची** व्यावसायिक चाचणी घेण्यात येईल.

३) **<u>तलाठी व वाहनचालक या पदाची लेखी परीक्षा, दि.११ सप्टेंबर, २०१६</u>** रोजी मुख्यालयी लेखी परीक्षा घेण्यात येईल. त्यानंतर <u>OMR</u> पध्दतीने उत्तर पत्रिकांची तपासणी करुन निकाल संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

९. **निवड पध्दत :**

१) तलाठी या पदाकरिता उमेदवारांची निवड लेखी परीक्षेत मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे करण्यात येईल.

२) वाहनचालक या पदाकरिता उमेदवारांची निवड लेखी परीक्षेत व व्यावसायीक चाचणीमध्ये मिळणाऱ्या गुणांच्या आधारे गुणानुक्रमे करण्यात येईल.

३) परीक्षेचा निकाल तयार करतांना ज्या उमेदवारांना समान गुण असतील अशा उमेदवारांचा गुणवत्ता क्रम शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.प्रनिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि. २७.०६.२००८ मधील मुद्या क्र.६ मध्ये दिलेल्या निकषानुसार लावला जाईल.

१०. **<u>सर्वसाधारण अटी व शर्ती :-</u>**

१. उमेदवाराने यापूर्वी जरी त्यांचे नाव रोजगार व स्वयंरोजगार मागदर्शन केंदाकडे (सेवायोजन कार्यालय) / एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय/जिल्हा सैनिक कार्यालयांमध्ये नोंदविले असेल तरी सुध्दा त्यांनी या पदांच्या भरतीसाठी स्वतंत्रपणे अर्ज करणे आवश्यक आहे.

२. मराठी व हिंदी भाषेचे ज्ञान असणे अनिवार्य.

३. अर्जदार हा महाराष्ट्र राज्याचा रहिवासी *(Domicile)* असला पाहिजे.

४. एका अर्जदाराचा (सामाजिक/ समांतर) आरक्षणानुसार तसेच एका पदाकरिता एकच अर्ज ग्राहय धरण्यात येईल.

५. उमेदवाराने उत्तरे लिहिण्यासाठी अथवा चिन्हांकित करण्यासाठी फक्त काळ्या शाईचा बॉलपेनच वापरावा.

६. अर्जदाराला लेखी परीक्षेसाठी उपस्थित राहण्याकरिता कोणत्याही प्रकारचा प्रवासभत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

७. लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे प्रमाण निश्चित करुन गुणानुक्रमे शासन निर्णयातील तरतुदींचे अधिन राहून उमेदवाराची निवड करण्यात येईल व त्यानुसार अंतिम निवड यादी प्रसिध्द करण्यात येवून त्या आधारे गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

८. लेखी परीक्षेत प्राप्त झालेल्या गुणांचे प्रमाण निश्चित करुन गुणानुक्रमे शासन निर्णयातील तरतुदींचे अधिन राहून व्यावसायिक परीक्षेसाठी निवड करण्यात येईल. लेखी परीक्षेत मिळालेले गुण, व्यावसायिक परिक्षेत मिळालेले गुण यांची एकत्रित बेरीज करुन अंतिम यादी प्रसिध्द करण्यात येईल व त्या आधारे गुणानुक्रमे पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

९. गुणानुक्रमे लेखी परीक्षेत उत्तीर्ण होऊन निवड झालेल्या उमेदवारांनी कागदपत्राचे तपासणीचे वेळी आवश्यकतेनुसार मुळ प्रमाणपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

१. शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र २. वयासंबंधी दाखला (जन्माचा दाखला/ शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र) ३. अधिवास प्रमाणपत्र ४. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवारांकरिता) ५. शासकिय / निमशासकिय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकारी यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र. ६. समांतर आरक्षणा विषयीचे प्रमाणपत्र. ७. जातवैधता प्रमाणपत्र ( असल्यास)

१०. मागासवर्गीय (इतर मागासवर्गासह) उमेदवारांना जात प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

११.प्रत्येक अर्जदाराने महाराष्ट्र नागरी सेवा नियम (लहान कुटूबाचे प्रतिज्ञापत्र) नियम, २००५मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना भरुन अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

१२.सदरहू जाहीरातीमध्ये दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता आहे. नमूद रिक्त पदांच्या संख्येत पदोन्नती/ पदावनती/ अनुकंपा भरती /राजीनामा /मृत्यु / अतिरिक्त संवर्ग कक्षा कडून उपलब्ध कर्मचारी इत्यादी कारणांमुळे पदसंख्या कमी जास्त होवू शकते. कोणत्याही कारणास्तव पदे कमी झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्तापित करता येणार नाही.

१३. निवड होणाऱ्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नवीन परिभाषीक अंशदायी निवृत्ती वेतन योजना लागू राहील.

१४.शासकीय / निमशासकीय कर्मचाऱ्यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याची परवानगी घेऊनच अर्ज भरणे आवश्यक आहे. निवड झालेल्या उमेदवारांना सदर पत्राची प्रत प्रमाणपत्र तपासणीवेळी सादर करावी लागेल. शासकीय कर्मचाऱ्याने नियुक्ती प्राधिकाऱ्याची परवानगी न घेता अर्ज केला असल्यास व अर्जामध्ये चुकीच्या माहितीच्या आधारे निवड झाल्यास निवड रद्द करण्यात येईल.

१५.प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त उमेदवारांना संबंधित जिल्हयातील जिल्हाधिकारी/ जिल्हा पूनर्वसन अधिकारी यांचेकडील प्रकल्पग्रस्त, भूकंपग्रस्त प्रमाणपत्राच्या सत्यप्रती प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी सादर करावी लागेल.

१६.अंशकालीन उमेदवारांनी त्यांच्या शासकीय अथवा निमशासकीय सेवेतील नियुक्तीमध्ये तीन वर्ष पूर्ण अंशकालीन काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये अनुभवाची नोंद केलेल्या सर्व अंशकालीन उमेदवारांना अनुभव प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी सादर करावे लागेल. प्रत्यक्ष निवड झालेल्या उमेदवारांच्या प्रमाणपत्राची पडताळणी झाल्यानंतरच नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.

१७.खेळाडूच्या आरक्षीत पदावर नेमणूकीकरिता ज्या खेळाडूंची निवड होईल त्यांची प्रमाणपत्रे संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पडताळणीसाठी पाठविण्यात येईल व पडताळणीच्या अहवालावरुन नियुक्तीबाबत विचार करण्यात येईल.

१८.शासन निर्णय, दि. १३.०१.२००९ नुसार अनुसूचित जाती व जमाती वगळता विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यामधील उमेदवारांनी आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी अर्जाच्या दिनांकास वैध असलेले सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाचे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, प्रमाणपत्र तपासणीच्यावेळी सादर करणे आवश्यक राहील.

१९. मागासवर्गीय उमेदवारांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक असल्यामुळे उमेदवाराची निवड झाल्यानंतर उमेदवाराला जातवैधतेकरीता नियुक्ती प्राधिकारी यांचे मार्फत जातवैधता समिति यांचेकडे जातपडताळणी प्रस्ताव सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. निवडीच्या दिनांकापासून ६ महिन्याचे आत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्याची जबाबदारी उमेदवाराची राहील. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी-२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६-ब, दि. १२.१२.२०११ नुसार मागास प्रवर्गाच्या उमेदवारांना त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र ६ महिन्याचे आत सादर करण्याच्या अटीस अधिन राहून नियुक्ती दिली जाईल. सहा महिन्यात जात वैधता प्रमाणपत्रासाठी परिपूर्ण प्रस्ताव कार्यालयामार्फत समितीकडे सादर करुन जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल. नियुक्ती दिल्यानंतर जात पडताळणी साठीचा प्रस्ताव हा संबंधित समितीकडे सादर केल्याची पोच उमेदवाराने कार्यालयास सादर करणे बंधनकारक आहे.

२०. स्थानिक अनुसूचित जमातीचा उमेदवार याचा अर्थ जे अनुसूचित जमातीचे उमेदवार स्वत: किंवा त्यांचे आई - वडील किंवा आजी आजोबा अमरावती जिल्हयाच्या अनुसूचित क्षेत्रामध्ये दि.२६ जानेवारी, १९५० पासून सातत्याने वास्तव्य करीत असल्याचा सबळ पुरवा जोडणे आवश्यक राहील. अशा अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना पात्र ठरविण्यात येईल.

२१.शासनाने विहीत केलेली शारीरिक पात्रता प्रमाणपत्र व चांगली वर्तणूक असल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील. शासन सेवेतील गट क आणि गट ड च्या पदावर उमेदवारांच्या नेमणुका करण्यापुर्वी चारित्र्य व पुर्वचारित्र्य तपासणी करण्यात येईल. उमेदवाराची नेमणुक करतांना उमेदवाराने चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्यासंदर्भात सुधारित साक्षांकन विहित नमुन्यात माहिती भरुन देणे आवश्यक राहील. उमेदवारांची चारित्र्य व पुर्वचारित्र्य पडताळणीचा अहवाल पोलीस विभागाकडून प्राप्त झाल्यानंतर प्रचलित शासन नियम व निर्णयानुसार नियुक्ती देण्याबाबत नियुक्ती प्राधिकारी निर्णय घेतील.

२२. अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाननीशिवाय परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येत आहे, त्यामुळे उमेदवार उत्तीर्ण झाल्यानंतर प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर तात्पुरती निवडयादी प्रसिध्द करण्यात येईल. केवळ परिक्षा उत्तीर्ण झाल्यामुळे उमेदवारास कोणताही हक्क प्राप्त होणार नाही त्यामुळे उमेदवाराने संबंधीत पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासुनच अर्ज सादर करावा.

२३.ऑनलाईन पध्दतीने उमेदवाराने अर्ज सादर करते वेळी वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रीयेच्या कोणत्याही टप्यावर त्यांना **अपात्र** ठरविण्यात येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्याची नियूक्ती रद्द करण्यात येईल. त्याबाबत उमेदवाराची कोणत्याही प्रकारची तक्रार ग्राहय धरल्या जाणार नाही.

२४.भरती प्रक्रियेबाबतची संपूर्ण माहिती **www.collamt.com** व **www.amravati.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२५. उमेदवारांना लेखी परीक्षेस,कागदपत्र तपासणीस स्वखर्चाने हजर राहावे लागेल.

२६. भरतीप्रक्रियेसंबंधीत देण्यात येणाऱ्या सुधारीत व अद्ययावत सूचना कार्यालयीन सूचना फलकावर व **www.collamt.com** व **www.amravati.nic.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२७. एखादया अर्जदारांने त्यांची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष राजकीय अथवा अन्य प्रकारे दबाब आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

२८. पदवीधर अंशकालीन, माजी सैनिक या समांतर आरक्षण प्रवर्गातून अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी नियुक्त समांतर आरक्षण प्रवर्गात मोडत असलेबाबतचे सक्षम प्राधिकारी यांचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

२९. शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र.८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का.२ दिनांक-२५/०५/२००१ अन्वये खुला,इ.मा.व,विजा-(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड) व वि.मा.प्र या प्रवर्गातील महिला उमेदवारांना राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी दिनांक-३१/०८/२०१६ या दिनांकापर्यंत वैध असलेला नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

३०. महिला उमेदवारांनी पुर्वाश्रमीच्या नावाने अर्ज करणे आवश्यक आहे.

३१. जाहिरातीत नमूद अटीत बदल,जाहिरातीच्या काही भागात अंशतः बदल करण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी, अमरावती यांनी स्वतःकडे राखुन ठेवले आहेत.

३२. काही प्रशासकीय अथवा तांत्रिक अडचण उद्भवल्यास निवड स्थगित अथवा रद्द करण्याचे संपुर्ण अधिकार जिल्हा निवड समितीस राहतील.

३३. पदभरती प्रक्रियेबाबत काही शंका, अडचणी, तक्रारी असल्यास निवासी उपजिल्हाधिकारी, अमरावती, अधिक्षक, जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती यांचेशी प्रत्यक्ष संपर्क करावा.

दिनांक :- ऑगस्ट, २०१६
ठिकाण :- अमरावती

(किरण गित्ते)
अध्यक्ष
जिल्हा निवड समिती तथा
जिल्हाधिकारी, अमरावती

# जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती.

**दैनिक वर्तमानपत्र -------------- दिनांक ऑगस्ट, २०१६ नुसार अर्ज.**

प्रती,
मा. अध्यक्ष
जिल्हा निवड समिती,
तथा जिल्हाधिकारी,
अमरावती.

| येथे नुकताच काढलेला फोटो चिकटावा व स्वाक्षरी करावी |
|---|

महोदय,

**विषय : --------------------------------या पदाकरीता विनंती अर्ज.**
(तलाठी/वाहनचालक)

**१. प्रवर्ग..................................**
(अ.जा./अ.ज./वि.जा.अ./भ.ज.ब./भ.ज.क/भ.ज.ड/वि.मा.प्र./इ.मा.व/खुला/स्थानिक अनुसूचीत जमाती उमेदवार)

आपले कार्यालयाची दैनिक .........................वर्तमानपत्रात नमूद जाहिरातीनुसार मी, ----------- (तलाठी/वाहनचालक) या पदासाठी-----------------या प्रवर्गातून ---------------या समांतर आरक्षणामधून - ----------------या विभागासाठी अर्ज करीत असून माझा तपशील खालीलप्रमाणे आहे.

१. संपूर्ण नांव : ....................................................................
(नाव प्रथम लिहावे )
नावात बदल असल्यास नमूद करावे :-----------------------------------------------

२. पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता : ....................................................................
(पिनकोडसह) -----------------------------------------------

३. दूरध्वनी/मोबाईल क्रमांक(आवश्यक) : ....................................................................

४. ई मेल :-----------------------------------------------

५. लिंग (महिला/ पुरुष) :-----------------------------------------------

६. वैवाहिक स्थिती/अपत्य संख्या : ----------------------- अपत्य संख्या --------------
(विवाहित/ अविवाहित)

७. जन्मतारीख/वय (अंकात ) : .........../.........../............ वय----------- वर्षे
(अर्जाच्या दिनांकास) (अक्षरात) :.......................................................................
अर्जाच्या दिनांकास वय ...........वर्षे ........... महिने ............दिवस

८. राष्ट्रीयत्व : -------------------------
(भारतीय / अभारतीय)

९. अर्जदाराची जात/प्रवर्ग अ. जात.........................

ब. प्रवर्ग...............

(अ.जा/अ.ज/वि.जा.अ/भ.ज.ब/भ.ज.ड/वि.मा.प्र/इ.मा.व/खुला/)

१०. अर्जदाराने कोणत्या प्रवर्गामधून अर्ज केला तो **प्रवर्ग (अर्जाचा प्रवर्ग)..................................**

(अ.जा./अ.ज./वि.जा.अ./भ.ज.ब./भ.ज.क/भ.ज.ड/वि.मा.प्र./इ.मा.व/खुला/ स्थानिक अनुसूचीत जमाती)

११. अर्जदाराने कोणत्या समांतर आरक्षणामधून अर्ज केला ते **समांतर आरक्षण--------------------**

(माजी सैनिक/महिला/अंशकालीन/खेळाडू/भूकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त/अपंग) (स्थानिक अनुसूचीत जमाती)

१२. अर्जदार अमरावती जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रामधील स्थानिक अनुसूचीत जमाती मधील रहिवासी आहे काय? ( दि.२६ जानेवारी १९५० पासून वास्तव्याचा पुरावा) : होय / नाही

१३. महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय?(डोमेसाईल प्रमाणपत्र) : होय / नाही

१४. जातीचे प्रमाणपत्र आहे काय? : होय / नाही

१५. जात वैधता प्रमाणपत्र आहे काय? : होय / नाही

१६. उमेदवार अपंग कायमस्वरुपी किमान ४०% असलेला आहे काय? : होय / नाही

असल्यास अपंगत्वाचा प्रकार (अस्थीव्यंग, अंध व कर्णबधीर) :----------------------------

अपंगत्वाची टक्केवारी -------% अपंगत्वाच्या प्रमाणपत्राचा दिनांक :----------------------

१७. अपंग उमेदवारास लेखी परीक्षेकरिता लेखनिकाची आवश्यकता आहे काय? : होय / नाही

१८. उन्नत / प्रगत गटात मोडता काय ? : होय / नाही

१९. अउन्नत गटात मोडता काय? : होय / नाही

२०. नॉन क्रिमिलेअर आहे काय? : होय / नाही

२१. अर्जदार माजी सैनिक आहे काय? : होय / नाही

२२. अर्जदार अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडू प्रवर्गातील आहे काय? : होय / नाही

असल्यास खेळाचा प्रकार ---------------------------- खेळाचे वर्ष ----------------------

राष्ट्रीय / राज्यस्तरीय ---------------------------------- श्रेणी/ पदक ---------------------

२३. अर्जदार प्रकल्पग्रस्त आहे काय? : होय / नाही

२४. अर्जदार भूकंपग्रस्त आहे काय? : होय / नाही

२५. अर्जदार शासकीय कर्मचारी आहे काय? : होय / नाही

२६. शासकीय कर्मचारी असल्यास कार्यलयाची परवानगी घेतली आहे काय? : होय / नाही

२७. अर्जदार स्वातंत्र्य संग्राम सैनिकांचा पाल्य आहे काय ? : होय / नाही

२८. पदविधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवार आहे काय? : होय / नाही

असल्यास शासकीय कार्यालयामध्ये किमान तीन (०३) वर्षोपर्यंत काम केल्याचे प्रमाणपत्र आहे काय? : होय / नाही

२९. अंशकालीन उमेदवाराने रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयाचे प्रमाणपत्र काढले आहे काय? : होय / नाही

३०. महिला असल्यास महिला समांतर आरक्षणामधून अर्ज केला आहे काय? : होय / नाही

३१. महिला आरक्षण प्रमाणपत्र आहे काय? : होय / नाही

३२. लहान कुटूंबाचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे काय ? : होय / नाही

३३. अर्जदारास मराठी भाषेचे पुरेसे ज्ञान आहे काय? : होय / नाही

३४. अर्जदाराने चलान बँकेमध्ये भरलेली आहे काय? : होय / नाही

असल्यास चलानचा Transaction ID (Journal No.)------------दिनांक---------रक्कम ₹ ----

३५.अर्जदाराची शैक्षणिक अर्हता :

| अक्र | शैक्षणिक पात्रता | उत्तीर्ण वर्ष | विद्यापीठ / बोर्ड | एकूण गुण | प्राप्त गुण | शेकडा गुण % |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पदवी/ पदविका/एच.एस.सी./ एस.एस.सी/वर्ग ४था | | | | | |
| २ | MS CIT | | | | | |
| ३ | | | | | | |
| ४ | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

३६. अर्जदाराने रोजगार/ सेवायोजन कार्यालयामध्ये नोंदणी केलेली आहे काय? : होय / नाही

असल्यास नोंदणी क्र.------------------------ दिनांक-------------------

३७. अर्जदाराने अर्जावर छायाचित्र (फोटा) लावून स्वाक्षरी केली आहे काय? : होय / नाही

## :: **घोषणापत्र** ::

मी .................................................................असे प्रमाणित करतो/करते की, आपले आस्थापनेवरील -----------------------या पदाकरीता (पदाचे नाव लेखी नमूद करावे)-------------------- या प्रवर्गातून---------------या सामाजिक/समांतर आरक्षणामधून -----------------या (महसूल) विभागासाठी (जाहिरातीनुसार) अचूक व परीपूर्ण माहिती भरुन अर्ज करीत असून सदर पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मी धारण केली आहे. जाहिरात काळजीपूर्वक वाचली असून सदर जाहिरातीतील अटी व शर्ती मला मान्य आहेत. या ऑनलाईन अर्जात मी संपूर्ण माहिती दिलेली असून सर्व माहिती संपूर्ण खरी, अचूक व योग्य आहे.

मी असेही जाहीर करतो/ करते की, कागदपत्रांच्या छाननीच्यावेळी / मुलाखतीच्यावेळी अर्जात उल्लेख केलेली सर्व मूळ प्रमाणपत्रे सादर करावी लागतील याची मला जाणीव आहे. या अर्जात दिलेली सर्व माहिती मी ऑनलाईन अर्ज जमा (सबमीट) करण्यापूर्वी काळजीपूर्वक तपासली असून ती अंतिम आहे व ती माझ्यावर बंधनकारक राहील याची मला जाणीव आहे.

मी असेही प्रमाणित करतो /करते की, वर दिलेली माहिती खोटी अगर चुकीची आढळून आल्यास माझी नोकरी गमाविण्यास व त्या अनुषंगाने होणाऱ्या कायदेशीर कारवाईस मी पात्र राहीन. त्याबाबत माझी कोणतीही हरकत राहणार नाही.

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराची स्वाक्षरी

**महाराष्ट्र नागरीसेवा (लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन) नियम २००५ मधील प्रतिज्ञापनाचा नमूना-अ**

**प्रतिज्ञापन**

नमूना-अ (नियम ४ पहा )

मी श्री / श्रीमती / कुमारी ----------------------------------------------------------------
श्री ------------------------------------------------------------------ यांचा / यांची / मुलगा / मुलगी / पत्नी वय ------------- वर्ष, राहणार ----------------------------------------------------- याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहीर करतो / करते की,

(१) मी ------------------------------------------------------------ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे .

(२) आज रोजी मला -------------इतकी हयात मुले आहेत , त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ या नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------------- आहे. ( असल्यास जन्म दिनांक नमूद करावा )

(३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदांसाठी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणिव आहे.

ठिकाण :-

दिनांक :- सही

**टिप :-** अविवाहीत उमेदवारांनी नमुना अ प्रतिज्ञापत्र लागू नाही असे नमूद करुन स्वाक्षरी करणे आवश्यक आहे.